# Chief Minister Employeemnet Generation Program

## 1. Introduction

The Government of Maharashtra has launched the *Chief Minister Employment Generation Programme (CMEGP)*—a credit-linked subsidy scheme aimed at promoting employment opportunities by encouraging the establishment of Micro and Small Enterprises (MSEs) with project costs up to ₹50 lakh across both rural and urban areas of the state.

---

## 2. Scheme Implementation

The scheme is implemented and monitored by the Directorate of Industries (DoI), under the administrative control of the Industries Department, Government of Maharashtra. Implementation is carried out through:

- District Industries Centers (DICs),
- Maharashtra State Khadi and Village Industries Board (KVIB),
- Participating banks.

The subsidy is routed through the Directorate of Industries to the identified banks for crediting into the beneficiary's bank account after a prescribed duration.

---

## 3. Vision

- To foster self-employment by facilitating new ventures and micro/small enterprises.
- To empower traditional artisans, unemployed youth, and individuals with innovative and pioneering business ideas by offering localized employment opportunities.
- To create sustainable employment and curb migration of rural youth to urban areas.
- To enhance the wage-earning capacity of beneficiaries and contribute to inclusive economic growth.


---

## 4. Objectives

- Establish 1,00,000 Micro and Small Enterprises in the next five years.
- Generate 8 to 10 lakh employment opportunities across Maharashtra.
- In FY 2019–20, the initial target was to establish 10,000 enterprises.
- District-wise targets are assigned to DICs and KVIB, based on criteria like district backwardness, unemployment rates, available resources, technology adoption, and population.

### 5. Financial Assistance under CMEGP

| Categories of beneficiaries under CMEGP | Beneficiary's Contribution (of project cost) | Rate of subsidy (of project cost) | |
|---|---|---|---|
| Area (location of project/unit) | | Urban | Rural |
| General Category | 10% | 15% | 25% |
| Special Category (includes SC / ST /Women/ Ex servicemen / differently abled) | 5% | 25% | 35% |



# Sanctioned Applications Report

| Sanctioned Applications Report dt 01-04-2025 to31.03.2025 | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| # | Regions | District | Revised Target | DIC | KVIB | SHG sanction | Applications Sanctioned | Sanction % (against actual target) |
| 1 | Pune | Satara | 673 | 811 | 97 | 7 | 915 | 135.96% |
| 2 | Nagpur | Chandrapur | 653 | 765 | 119 | | 884 | 135.38% |
| 3 | Pune | Sangli | 688 | 831 | 42 | | 873 | 126.89% |
| 4 | Amravati | Buldhana | 678 | 568 | 259 | | 827 | 121.98% |
| 5 | Kokan | Ratnagiri | 678 | 725 | 90 | | 815 | 120.21% |
| 6 | Pune | Kolhapur | 1098 | 939 | 280 | | 1219 | 111.02% |
| 7 | CH. Sambhaji Nagar | Dharashiv | 723 | 536 | 263 | | 799 | 110.51% |
| 8 | Nagpur | Nagpur | 1023 | 889 | 233 | | 1122 | 109.68% |
| 9 | Amravati | Amravati | 845 | 623 | 287 | | 910 | 107.69% |
| 10 | Amravati | Akola | 848 | 567 | 332 | | 899 | 106.01% |
| 11 | Amravati | Washim | 518 | 315 | 224 | | 539 | 104.05% |
| 12 | Nanded | Hingoli | 503 | 381 | 139 | | 520 | 103.38% |
| 13 | Ch. Sambhaji Nagar | Ch. Sambhaji Nagar | 982 | 932 | 80 | 2 | 1014 | 103.26% |
| 14 | Kokan | Sindhudurg | 488 | 454 | 48 | | 502 | 102.87% |
| 15 | Nanded | Latur | 643 | 523 | 133 | | 656 | 102.02% |
| 16 | Nagpur | Wardha | 481 | 343 | 146 | 1 | 490 | 101.87% |
| 17 | Nashik | Ahmednagar | 955 | 815 | 157 | | 972 | 101.78% |
| 18 | Nagpur | Gadchiroli | 475 | 365 | 118 | | 483 | 101.68% |
| 19 | Amravati | Yavatmal | 602 | 462 | 149 | | 611 | 101.50% |
| 20 | Kokan | Raigad | 744 | 627 | 127 | 1 | 755 | 101.48% |
| 21 | Kokan | Palghar | 690 | 606 | 91 | | 697 | 101.01% |
| 22 | Nanded | Parbhani | 448 | 264 | 142 | | 406 | 90.63% |
| 23 | Nashik | Jalgaon | 748 | 487 | 176 | | 663 | 88.64% |
| 24 | Nashik | Nandurbar | 448 | 319 | 43 | | 362 | 80.80% |
| 25 | Nagpur | Gondia | 448 | 318 | 37 | | 355 | 79.24% |
| 26 | Nanded | Nanded | 798 | 416 | 150 | | 566 | 70.93% |
| 27 | Nashik | Nashik | 1198 | 722 | 122 | | 844 | 70.45% |
| 28 | Pune | Solapur | 798 | 450 | 110 | 1 | 561 | 70.30% |
| 29 | Pune | Pune | 1198 | 642 | 37 | 93 | 772 | 64.44% |
| 30 | Nashik | Dhule | 478 | 252 | 54 | | 306 | 64.02% |
| 31 | Nagpur | Bhandara | 478 | 256 | 46 | | 302 | 63.18% |
| 32 | Kokan | Thane | 998 | 390 | 116 | 2 | 508 | 50.90% |
| 33 | CH. Sambhaji Nagar | Jalna | 628 | 263 | 62 | | 325 | 51.75% |
| 34 | CH. Sambhaji Nagar | Beed | 600 | 131 | 59 | 12 | 202 | 33.67% |
| 35 | MMR | Mumbai_Upnagar | 448 | 114 | | | 114 | 25.45% |
| 36 | MMR | Mumbai | 298 | 55 | | | 55 | 18.46% |
| **Grand Total** | | | **25000** | **18156** | **4568** | **119** | **22843** | **91.37%** |

# Success Stories



लोकमत

वर्धा, मंगळवार, दि. १५ एप्रिल २

## मुख्यमंत्री रोजगारनिर्मितीत जिल्ह्यात महिलांचा वाटा मोठा

२७७ महिलांनी घेतली उद्योग क्षेत्रात भरारी : जिल्हा उद्योग केंद्रामार्फत शासनाच्या योजनेचा मिळाला लाभ, अनेक बेरोजगारांचे भाग्य उजळले

लोकमत न्यूज नेटवर्क

**निकष काय?**

**४९० हजार अर्ज मंजूर**

**काय आहे मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजना?**

**२७७** महिलांची उद्योगात भरारी

Hello Wardha
Page No. 4 Apr 15, 2025



लोकमत

मस्ट READ

## मुख्यमंत्री रोजगार निर्मितीत जिल्ह्याची १०१ टक्के कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** युवक-युवतींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी तसेच उद्योजकतेला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यात वर्धा जिल्ह्याने १०० टक्क्यांहून अधिक प्रस्तावांना मंजुरी देत उद्दिष्टाच्या पुढे जात कामगिरी केली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये महिलांचा टक्का पुरुषांच्या तुलनेत अधिक आहे.

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात वर्धा जिल्ह्याने १०१.८७ टक्के नवउद्योजकांच्या प्रस्तावांना मंजुरी देत उद्दिष्टपूर्ती साधली आहे. विशेष म्हणजे योजना अंमलात आल्यापासून पहिल्यांदाच वर्धा जिल्ह्याने १०० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट साध्य केले आहे.

नागपूर विभागांतर्गत वर्धा जिल्ह्यासाठी ४८९ उद्योग प्रकल्प उभारणीचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. सन २०२४-२५ या वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) वर्धा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ४९० नवउद्योगांची निर्मिती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेतला होता. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या देखरेखीखाली जिल्हा प्रशासनाने ही योजना प्रभावीपणे राबवून उद्दिष्टपूर्ती केली आहे.

**१०० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्ट गाठले : पालकमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन ठरले महत्त्वाचे**

### जिल्ह्यातील तालुकानिहाय लाभार्थ्यांची संख्या

वर्धा -१९२, देवळी -७०, हिंगणघाट -५२, समुद्रपूर -४७, आर्वी -४६, सेलू -४४, आष्टी -२२, कारंजा (घाडगे) येथील १७ लाभार्थ्यांचा समावेश आहे.

### उत्पादन क्षेत्राला ५०, तर सेवा क्षेत्राला २० लाखांचे कर्ज

या योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील उद्योजकाला ५० लाख रुपये तर सेवा क्षेत्रातील उद्योजकाला २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातील उद्योजकाला कर्ज रकमेच्या १५ ते २५ टक्के तर विशेष प्रवर्ग, एससी, एसटी, अपंग, माजी सैनिक, महिला, ओबीसी व अल्पसंख्याकांना २५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती अर्जांना मान्यता देते. त्यानंतर संबंधित प्रकरण बँकेकडे पाठविण्यात येते. बँकेने कर्ज प्रकरणाला मंजुरी दिल्यानंतर लाभार्थीच्या खात्यात अनुदान जमा होते.

संग्रहीत

**४९० जणांना मिळाला लाभ**

**गत आर्थिक वर्षात जिल्हा उद्योग केंद्राला मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत ४८९ लाभार्थी करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते.**

जिल्हा उद्योग केंद्राने ४९० जणांना लाभ देत १०१.८७ टक्के इतके उद्दिष्ट गाठले आहे. नवीन उद्योग सुरु करण्यामध्ये २७७ महिला व २१३ पुरुषांचा समावेश आहे.

**त्यांच्या कर्ज प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. महिलांचा पुढाकार वर्धा जिल्ह्यासाठी गौरवास्पद बाब आहे. यात उत्पादन क्षेत्रातील एकूण १२८ उद्योजकांना व सेवा क्षेत्रातील ३६२ उद्योजकांचे कर्ज प्रस्ताव बँकेकडून मंजूर करण्यात आले आहे.**

"युवक-युवतींनी नोकरीच्या शोधात न राहता नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. स्वउद्योगांच्या माध्यमातून आपली प्रगती साधण्यासोबतच इतरांना देखील त्याचा लाभ कसा देता येईल, याकडे विशेष लक्ष द्यावे. शासन सुद्धा त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. शासकीय योजनेचा लाभ घेऊन देशाच्या विकासाला हातभार लावावा.

**डॉ. पंकज भोयर,** पालकमंत्री वर्धा.

Hello Wardha
Page No. 4 Apr 07, 2025



## २८ कोटींच्या कर्ज मंजुरीतून ३६२ लाभार्थी उभारणार स्वतःचे उद्योग

### जिल्हा निर्मितीनंतर प्रथमच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत १०० टक्के उद्दिष्ट पूर्तता; किमान अडीच हजार बेरोजगारांना मिळणार रोजगार

**नंदुरबार :** जिल्हा निर्मितीपासुन पहिल्यांदा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत वित्तीय संस्था, बँकाच्या सहकार्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकुण ३६२ लाभार्थ्यांचे सुमारे २८ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे मंजुर करण्यात आली. ज्यात निर्मिती उद्योग घटक ८१ तसेच सेवा उद्योग घटक २८१ इतके असून कर्ज मंजुर झालेल्या लाभार्थ्यांना शासनामार्फत अनुदान, मार्जिनमनी रक्कम, अनुदान, मार्जिनमनी रक्कम १५ ते ३५ टक्क्यांप्रमाणे मिळणार आहे. सदर योजनेच्या माध्यमाने बेरोजगारी कमी होऊन स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.यातून किमान २००० ते २५०० युवक युवतींना रोजगार निर्मिती झाल्याची माहिती जिल्हा नियोजन भवन कार्यालयात पार पडलेल्या गुंतवणूक परिषदेप्रसंगी देण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन कार्यालयात पार पडलेल्या गुंतवणूक परिषदेप्रसंगी उद्योग विभागाचे वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक, दिलीप पाटील व्यवस्थापक, विभागीय कार्यालय, नाशिक तसेच मैत्री, मुंबई कक्षाचे किशोर चव्हाण उपस्थित होते. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या प्रयत्नाने जिल्ह्याने १०० टक्के कर्ज मंजुरीचे उद्दिष्ट पुर्ततेसाठी ज्यांनी परिश्रम घेतले, अशा अधिकारी कर्मचाऱ्यांचे वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक विभाग यांनी जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी, सचिन गांगुर्डे, अग्रणी बँक व्यवस्थापक, एसबीआय नंदुरबार तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास व त्यांचे सर्व सहकारी यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम उद्दिष्ट पूर्ततेसाठी दीपेंद्रसिंह कुशवाह विकास आयुक्त उद्योग मुंबई यांनी वर्षाच्या सुरुवातीपासुन योजनेचे उद्दिष्ट पुर्तीसाठी वेळोवेळी विभागीय आयुक्त, (महसुल) जिल्हाधिकारी, तसेच बँकांचे विभागीय अधिकारी यांच्या आढावा बैठका तसेच ऑनलाईन बैठकांच्या माध्यमाने समन्वय साधुन कर्ज मंजुरीसाठी मार्गदर्शन केले. तसेच विभागीय स्तरावर वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक यांनी वेळोवेळी बँकाचे झोनल ऑफिसर यांच्या आढावा बैठका, जिल्हास्तरावर जिल्हा बँक समन्वयक, शाखा व्यवस्थापक यांच्या बैठका तसेच ऑनलाईनद्वारे बैठका आयोजित करुन उद्दिष्ट पुर्ततेसाठी प्रयत्न केले. तसेच सचिन गांगुर्डे, व्यवस्थापक. जिल्हा अग्रणी बँकेच्या सहकार्याने जिल्हा स्तरावरील बँकेचे शाखाधिकारी यांच्याशी समन्वय साधुन गाव पापळी तालुका स्तरावर कॅम्पचे आयोजन करुन जास्तीत जास्त योग्य कर्ज प्रस्ताव मंजरीसाठी दीपक शिवदास, महाव्यवस्थापक व त्यांचे सहकारी एन.पी.पटील व्यवस्थापक, दिपक सुर्यवंशी, गिरीश चौधरी, उद्योग निरिक्षक, शेख नासीर यांनी परीश्रम घेतले.

### १००० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट

**चालु आर्थिक वर्षात १००० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट जिल्हयास प्राप्त झाले आहे. त्यासाठी सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतीनी योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन दिपक शिवदास, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी केले आहे.**



महाराष्ट्र टाइम्स नागपूर । मंगळवार, ०१ आक्टोंबर २०२४

## महिला क्लस्टरची विदेश भरारी

### बुटीबोरीतून जाताहेत दक्षिण अमेरिकेत रेडिमेड कपडे, उद्योगाला बळ

पॉझिटिव्ह प्लस

निखिल भुते
Nikhil.Bhute@timesgroup.com

'मुलीच्या जातीला शिवणकाम वगैरे यायला हवे' ते महिला फॅशन डिझायनर, असा प्रवास राहिलेल्या स्त्रियांनी फॅशनविश्वात स्वतःच्या नावाचा डंका वाजविला. या पार्श्वभूमीवर शहरातील महिलांनीदेखील रफ्फू, तुरपाई, पिको फॉलपुरते मर्यादित न राहता बुटीबोरी एमआयडीसीत स्वतःचे गारमेंट कॉमन फॅसिलिटी सेंटर (सीएफसी) कम क्लस्टर सुरू केले आहे. येथे तयार होणाऱ्या रेडिमेड कपड्यांना देशातच नव्हे तर दक्षिण अमेरिकेतसुद्धा मागणी होत आहे.

बचतगटाच्या रूपाने शहरातील अनेक महिला शिवणकाम, कशिदाकारी करीत आहेत. 'आमच्याकडे पिको-फॉल करून मिळेल', असे लिहिलेली फलके आपण शहरातील विविध लोकवस्तीत ...

(चित्र : एआय)

आयुष्याच्या सुरुवातीपासुन सुईदोऱ्याची साथ तिला लाभत असते. आजही किमान कामचलाऊ शिवणकाम तरी मुलीला यायला हवे, यासाठी घरचे आग्रही असतात. या सुईदोऱ्याने अनेकींना रोजगार दिला आहे. शिवणयंत्राची चाके किती तरी घरांचे अर्थचक्र चालवित आहेत. बदलत्या काळानुसार, कपड्यांची स्टाइल, फॅशन बदलली आहे. त्यानुरूप आधुनिक स्वरूपातील ...

त्यातदेखील आजच्या महिला मागे राहिलेल्या नाहीत. अगदी ब्रॅण्डेड कपडे तयार करण्याची किमया नागपूरच्या महिला साधताहेत. वर्षभरापूर्वी बुटीबोरी एमआयडीसीमध्ये एक एकर जागेवर अभया वुमन गारमेंट क्लस्टर सुरू झाले.

अनुसूचित जातीतील महिलांनी पुढे येत साकारलेल्या या क्लस्टर कम सीएफसीमध्ये साकारण्यात येणाऱ्या ...

### दोनशे सखींना रोजगार

बुटीबोरीतील या सीएफसीमध्ये शहरातील ५० ते ६० छोट्या महिला उद्योजकांनी एकत्र येत काम सुरू केले आहे. या माध्यमातून २०० महिलांना रोजगार प्राप्त झाला आहे. येथे रेडिमेड कपड्यांवर करण्यात येणारे एम्ब्रॉयडरी, डिजिटल पेंटिंग, स्टिचिंग आदींसाठी आवश्यक असलेली यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. प्रत्येक महिलेला ही महागडी यंत्रे विकत घेणे शक्य नसल्यामुळे त्यांनी एकत्र येत क्लस्टर स्वरूपात स्वतःच्या आर्थिक विकासाचा मार्ग खुला केला आहे.

### गारमेंट हबच्या दिशेने वाटचाल

शहरातील महिलांद्वारे संचालित बुटीक आणि रेडिमेड गारमेंटसच्या दुकानांमध्ये वाढ झाली आहे. कपड्यांबाबत लोकांमध्ये आलेली जागरूकता लक्षात घेत उप्पलवाडी येथे ऑरेंज सिटी गारमेंट क्लस्टरने जोर पकडला आहे. यात आता गारमेंट कॉमन फॅसिलिटी सेंटरची भर पडली असून, पूर्णतः महिलांद्वारे संचालित असे हे सीएफसी बुटीबोरी एमआयडीसीमध्ये कार्यान्वित झाले आहे. हे सीएफसी संपूर्णपणे महिला संचालित करणार असले तरी येथे महिला आणि पुरुष दोघांच्या कपड्यांची निर्मिती होत आहे. ऑरेंज सिटी गारमेंट क्लस्टरच्या जोडीला आलेल्या सीएफसीमुळे नागपूरच नव्हे तर अख्ख्या विदर्भाची रेडिमेड कपड्यांची आवश्यकता पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त होत असतानाच उपराजधानीची वाटचाल गारमेंट हबच्या दिशेने होत आहे.

अमेरिकेतील पेरू यांसह विविध ... क्लस्टरची ही विदेशी भरारी अने...



लोकमत

चंद्रपूर, रविवार, दि. १३ एप्रिल २०

## मुख्यमंत्री रोजगारनिर्मितीमध्ये जिल्ह्यातील महिलांचा वाटा मोठा

वर्षभरासाठी जिल्हा उद्योग केंद्राला ६५३ अर्जांचे होते उद्दिष्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेअंतर्गत जिल्हा उद्योग विभागातर्फे यंदा दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश आले आहे. जिल्हा उद्योग विभागाला ६५३ अर्जांचे उद्दिष्ट वर्षभरासाठी दिले होते. ते पूर्ण करून ८५५ जणांना बँकांच्या मदतीने उद्योग उभारणीसाठी हातभार लावला आहे. यामध्ये उद्योजिकांचा ४५ टक्के वाटा आहे.

जिल्हा उद्योग विभागातर्फे अडीच हजार अर्ज बँकांकडे मंजुरीसाठी पाठविले होते. जास्तीत जास्त अर्ज मंजूर व्हावेत, यासाठी जिल्हा उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक ऋतुराज सूर्य, उद्योग निरीक्षक शालू घरत, उद्योग निरीक्षक निरंजना पायघन हे जातीने लक्ष देत होते. मुख्यमंत्री शंभर दिवस सातकलमी कृती कार्यक्रमाअंतर्गत जिल्ह्याचे आठशेच्या उद्दिष्टात घसरण होऊन ते ६५३ झाले होते. मात्र, जिल्हा उद्योग केंद्राने बँकेच्या सततच्या पाठपुराव्यात तब्बल ८८७ प्रकरणे पास केली आहेत.

### विभागात प्रथम, राज्यात पटकावला द्वितीय क्रमांक

योजनेचे उद्दिष्ट पूर्तीत जिल्हा विभागात प्रथम, तर राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. यासाठी महाव्यवस्थापक ऋतुराज सूर्य, एलडीएम राजू नंदनवार, बँक ऑफ महाराष्ट्रचे झोनल मॅनेजर प्रमोद साबळे, एसबीआय एजीएम भारत पाटील, विकेजीबीचे राजकुमार जाधव, इंडियन बँकेचे शुभम साहू यांचे सहकार्य लाभले.

### काय आहे योजना?

१. शासनातर्फे राज्यातील युवक, युवतींना स्वयंरोजगारातून स्वतःची व दुसऱ्याची उन्नती व्हावी, या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना राबवली जात आहे.

२. या योजनेअंतर्गत उत्पादन उद्योग, सेवा उद्योग, कृषिपूरक व्यवसाय कृषीवर आधारित उद्योग, ई-वाहतूक व्यवसाय, फिरते विक्री केंद्र व्यवसाय करण्यासाठी कर्ज उपलब्ध केले जाते.

३. प्रक्रिया व निर्मिती व्यवसायासाठी कमाल ५० लाख व सेवा उद्योग प्रवर्गातील प्रकल्पासाठी कमाल २० लाख रुपये कर्ज रूपात दिले जातात.

### 'उमेद'चा सक्रिय सहभाग

जिल्हा उद्योग केंद्राने जिल्हा परिषदेच्या 'उमेद'चा सहकार्याने अनेक महिलांना रोजगाराभिमुख केले आहेत.

### कोणत्या बँककडून किती कर्ज प्रकरणे मंजूर?

| बँक | मंजूर प्रकरणे |
| --- | --- |
| बँक ऑफ महाराष्ट्र | २३[illegible] |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १८[illegible] |
| इंडियन बँक | १२[illegible] |
| विदर्भ कोकण ग्रामीण बँक | १२[illegible] |

"मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेला बळकटी देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. 'उमेद'च्या माध्यमातून मोठा हातभार लागला. तसेच सर्व बँकांचे सहकार्य मिळाले. त्यामुळेच आमचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून आम्ही नागपूर विभागात प्रथम, तर राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आलो आहोत.

**ऋतुराज सूर्य,**
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर

Hello Chandrapur
Page No. 4 Apr 13, 2025

# इकोनॉमी बूस्टर बन रहीं महिलाएं

## इंडस्ट्रियल सेक्टर में बढ़ता जा रहा है योगदान, दिखा रहीं प्रतिभा

■ राजेंद्र मानकर @ नवभारत.

नागपुर. नए दौर में महिलाएं इकोनॉमी बूस्टर बनकर उभर रही हैं. आज वे सरकारी या निजी नौकरियों के पीछे भागने वाली नहीं बल्कि वे अपनी प्रतिभा के दम पर नौकरी देने वाली बन रही हैं. महिलाओं का वित्तीय समावेशन ही आर्थिक तरक्की की धुरी साबित हो रहा है. एमएसएमई में उनका योगदान बढ़ने से जिले में उद्योगों की संख्या बढ़ती जा रही है. महिलाओं की बढ़ती तरक्की में सरकार का भी बड़ा योगदान है. सरकार उनके सपने को पूरा करने के लिए योजनाएं भी चलाती है. इन्हीं योजनाओं के माध्यम से जिला उद्योग केंद्र (डीआईसी) बिजनेस के उनके सपने को पूरा कर रहा है. उद्योजक बनने की चाह लेकर आने वालों में महिलाएं की संख्या बढ़ती जा रही है. वित्त वर्ष 2023-24 की बात करें तो जिला उद्योग केंद्र में 4,000 से ऊपर आवेदन आए जिसमें 823 के लोन स्वीकृत हुए. इसमें 424 पुरुषों और 400 के करीब महिलाओं के लोन स्वीकृत हुए. अभी 4 माह (अप्रैल से जुलाई-24) में करीब 700 आवेदन आए जिसमें से 61 लोन स्वीकृत हुए. इसमें महिलाओं की 31 है. बैंकों के नियम और शर्तों को पूरा नहीं कर पाने के चलते कइयों के उद्योग लगाने के सपने अधूरे रह जाते हैं. मुख्यमंत्री रोजगार योजना में वर्ष 2023-24 में स्वीकृत लोन की राशि 17.24 करोड़ है.

**399** महिलाओं ने लोन लिया वर्ष 2023-24 में | **424** पुरुषों ने उद्यम शुरू करने लोन लिया 2023-24 में | **₹17.24** करोड़ का ऋण का हुआ वितरण 2023-24 में

**9%** का योगदान था वित्त वर्ष 2017-18 में

**15%** से अधिक योगदान बढ़ा वित्त वर्ष 2023-24 में

**₹823** का लोन हुआ स्वीकृत

**15%** एक्सपोर्ट बढ़ता जा रहा हर वर्ष



### वर्ष 2023-24 में श्रेणी के अनुसार स्वीकृत ऋण

| जेंडर | जनरल | एससी | एसटी | ओबीसी | वीजेएनटी | माइनॉरिटी | कुल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | 66 | 125 | 20 | 192 | 18 | 3 | 424 |
| महिला | 187 | 91 | 18 | 91 | 8 | 4 | 399 |
| कुल | 253 | 216 | 38 | 283 | 26 | 7 | 823 |

**₹ 02** लाख के करीब MSME पंजीकृत हैं जिले में

| ग्रामीण/शहर | | | मैन्युफैक्चरिंग/सर्विस | | |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | शहर | कुल | विनिर्माण | सर्विस | कुल |
| 358 | 465 | 823 | 295 | 528 | 823 |

### इस तरह बढ़े रोजगार, यूनिट और निवेश

| वर्ष | यूनिट | रोजगार | निवेश |
|---|---|---|---|
| 2020-21 | 29,368 | 1,93,910 | 3,987.40 |
| 2021-22 | 44,397 | 2,01,409 | 1,991.07 |
| 2022-23 | 52,053 | 2,12,683 | 1,030.07 |
| 2023-24 | 59,426 | 2,10,260 | 1,298.24 |
| 1 अप्रैल से 30जून-24 | 14,085 | 49,185 | 327.54 |
| कुल | 1,99,329 | 8,67,447 | 8,626.07 |

(निवेश करोड़ में)

### 8.67 लाख से अधिक को रोजगार

उद्योगों की बात करें तो पिछले कुछ वर्षों में लघु उद्योग शुरू करने का चलन बढ़ा है. नागपुर जिले में कुल 1,99,329 एमएसएमई यूनिट का रजिस्ट्रेशन हुआ है. इनमें से 1,94,121 सूक्ष्म उद्यम, 4,677 लघु उद्यम और 531 मध्यम उद्यम का समावेश है. इन तीन प्रकार की इकाइयों के माध्यम से 8,67,447 लोगों को रोजगार मिला और 8,626.70 करोड़ का निवेश हुआ. उद्यम रजिस्ट्रेशन लगातार बढ़ रहा है और इसका लाभ एमएसएमई इकाइयों को मिल रहा है.

### बदलता जा रहा व्यवसाय का आकार



जिला उद्योग केंद्र, नागपुर के महाव्यवस्थापक एस.एस. मुदम्मवार बताते हैं कि महिलाओं के उत्पादक व उद्यमी के रूप में सक्रिय होने से व्यवसाय का आकार बदलता जा रहा है. अब महिलाएं भी उद्योग क्षेत्र में अपनी पहचान बना रही हैं और स्वयं के उद्यमों को सफल बनाने के लिए पूरी तरह से जुट रही हैं. वित्त वर्ष 2017-18 में उद्योग में महिलाओं का योगदान 9% था जो वर्ष 2023-24 में बढ़कर 15% पर पहुंच गया. महिलाओं के उद्यमों और उत्पादकों को सफल बनाने के लिए सरकार द्वारा पूरा सहयोग किया जा रहा है. वर्ष 2023-24 में लोन लेने वालों में हर कैटेगरी के महिला व पुरुष हैं. इसमें जनरल 253, एसी 216, एसटी 38, ओबीसी 283, वीजेएनटी 26 और माइनॉरिटी कैटेगरी में कुल 7 लोग शामिल हैं. 823 स्वीकृत लोन में ग्रामीण के 358 तो शहर के 465 आवेदन रहे. इसके माध्यम से 295 मैन्युफैक्चरिंग इंडस्ट्री व 528 सर्विस इंडस्ट्रीज लगाई गईं.

### बढ़ रही उद्योग लगाकर रोजगार देने वालों की संख्या

स्वरोजगार शुरू करने वाले पुरुष व महिला आवेदकों की संख्या जिला उद्योग केंद्र में बढ़ती जा रही है. वर्ष 2019-20 में 41 आवेदकों के लोन स्वीकृत हुए थे. वर्ष 2020-21 में 192 आवेदकों के लोन स्वीकृत हुए थे. वर्ष 2021-22 में इसमें हल्की गिरावट देखी गई. इसमें 137 लोन स्वीकृत किये गये. वर्ष 2022-23 की बात की जाये तो 365 लोन स्वीकृत हुए. वर्ष 2023-24 में 823 लोन व 2024-25 में 1,200 लोन स्वीकृत करने का लक्ष्य लेकर जिला उद्योग केंद्र चल रहा है.

---

लोकमत

# 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती'मध्ये महिलांची भरीव वाटचाल!

## ३२९ महिलांची उद्योग क्षेत्रात भरारी: जिल्हा उद्योग केंद्राकडून सहकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्ह्यातील अनेक तरुण - तरुणींना उद्योग सुरू करण्यासाठी संधी मिळत आहे. विशेष म्हणजे यंदा जिल्ह्यातून मंजूर झालेल्या ५४० अर्जांपैकी तब्बल ३२९ अर्ज महिलांचे आहेत. या माध्यमातून महिलांनी विविध क्षेत्रांत उद्योग स्थापन करत स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

स्थानिक बँकांमार्फत कर्ज मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, जिल्हा उद्योग केंद्राकडून त्यासाठी सहकार्य केले जात आहे. जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापकांनी दिलेल्या माहितीनुसार, योजनेची अंमलबजावणी समाधानकारक झाली असून, जिल्ह्यातील बेरोजगार युवक - युवतींना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे.

**३२९**

**महिलांना कर्ज पुरवठा**


मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत एकूण ५४० अर्ज मंजूर झाले आहेत. त्यात ३२९ अर्ज महिलांचे असून, उद्योगात महिला भरारी घेत असल्याचे दिसत आहे.

### काय आहे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना?

या योजनेचा बेरोजगार तरुणांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, हा त्यामागील उद्देश असून, या अंतर्गत अनुदानासह बँकांकडून कर्ज दिले जाते.

> मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे जिल्ह्यातील अनेक युवक-युवती उद्योजक बनले आहेत. विशेषतः महिलांचा सहभाग उत्साहवर्धक आहे. पुढील टप्प्यात प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.
>
> \- आकाश बांगर, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, वाशिम

### कोणत्या बँकेकडून किती कर्ज प्रकरणे मंजूर?




### पात्रतेचे निकष काय?

अर्जदाराचे वय १८ ते ४५ वर्षादरम्यान असावे, तो किंवा ती किमान १०वी उत्तीर्ण असावे, महाराष्ट्राचा रहिवासी आणि कोणताही उद्योग सुरू केलेला नसावा.



---

मुंबई तरुण भारत
Main Edition | 2025-04-02 | Page- 7

# उद्योग विभागाची १०० टक्के उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल

## उद्योगमंत्री उदय सामंत; १०० दिवसांच्या कामकाज आराखडासंदर्भात बैठक

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**



''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रत्येक विभागाला १०० दिवसांचा आराखडा निश्चित करून दिला. त्याअनुषंगाने उद्योग विभागाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची १०० टक्के पूर्तता होण्याकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे,'' अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंगळवार, दि. १ एप्रिल रोजी दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या बैठकीस उद्योग सचिव डॉ. पी. अनबलगन, 'एमआयडीडी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु, विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह, सहमुख्य कार्यकारी अधिकारी विजय राठोड तसेच उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दावोस येथे झालेल्या करारामध्ये उद्योग विभागाने २३५ टक्के उद्दिष्टपूर्ती केली असल्याचे सांगून उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, ''परकीय थेट गुंतवणुकीत महाराष्ट्रात देशाच्या तुलनेत ४०.८९ टक्के गुंतवणूक झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग, 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ', उद्योग संचालनालय, मैत्री, 'महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ', शासकीय मुद्रणालय आणि क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या उद्दिष्टांची ९० ते ९५ टक्के पूर्तता झाली असून संपूर्ण उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल सुरू आहे,'' असे त्यांनी सांगितले. यावेळी उद्योगमंत्री सामंत यांनी सर्व कार्यालयांत स्वच्छता आणि नूतनीकरण करण्याच्या सूचना दिल्या.

### अभिजात मराठीसाठी लवकरच समिती

''मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून आता भाषेच्या संशोधन आणि विकासासाठी तसेच भाषेच्या उन्नतीसाठी काम करण्यात येत आहे. यासाठी लवकरच एक समिती गठित करण्यात येईल,'' असे मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी सांगितले. ''मराठी भाषा विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात 'मराठी भाषा भवन' उभारण्याचे काम सुरू आहे. सीमाभागात असलेल्या गावामध्ये मराठी भाषेच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात येईल,'' असे मराठी भाषामंत्री सामंत यांनी सांगितले.



---

लोकमत
छत्रपती संभाजीनगर, बुधवार, दि. १६ एप्रिल

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती; ५२० जणांना कर्ज वितरित!

## महिलांचाही समावेश : रोजगाराचा प्रश्न मिटण्यास होणार मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा उद्योग केंद्राने आपले उद्दिष्ट पूर्ण केले असून तब्बल ५२० जणांना कर्ज उपलब्ध झाले आहे. उद्योग, व्यवसायातून रोजगार निर्माण होण्यास मदत होणार आहे.

बेरोजगारी कमी होऊन तरुणांच्या हाताला काम मिळावे, कामानिमित्त मोठ्या शहरात होणारे स्थलांतर थांबावे, यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. यात उत्पादन व्यवसायासाठी ५० लाखांपर्यंत, तर सेवा उद्योग व्यवसायासाठी २० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा रोजगार थाटून आत्मनिर्भर बनण्याचे तरुणांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. २०२४-२५ या वर्षासाठी ५०३ लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट जिल्हा उद्योग व खादी ग्रामोद्योग कार्यालयास मिळाले होते. त्यानुसार लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केले आहेत. यातील पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव बँकांकडे पाठविण्यात आले होते. त्यानुसार ५२० लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. कर्ज उपलब्ध झाल्याने उद्योग, व्यवसाय उभारण्यास मदत होणार आहे.

### काय आहे योजना?

राज्यातील युवक- युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी, त्यांना कर्ज उपलब्ध करून देणे व या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

### निकष काय ?

योजनेत १० लाखांवरील प्रकल्पासाठी लाभार्थी ७ वी उत्तीर्ण, तर २५ लाखांवरील प्रकल्पासाठी १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वय कमीत कमी १८ तर जास्तीत जास्त ४५ वर्षांपर्यंत असावे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, माजी सैनिक यांच्यासाठी ५ वर्षे शिथिल) लाभार्थी कोणत्याही बँकेचा, पतसंस्थेचा थकबाकीदार नसावा, त्याचा सिबिल स्कोअर चांगला असावा.

### असे प्रस्ताव मंजूर

| | |
|---|---|
| एकूण उद्दिष्ट | ५०३ |
| जिल्हा उद्योग केंद्र | ३८१ |
| खादी व ग्रामोद्योग मंडळ | १३९ |

### जिल्हाधिकाऱ्यांचा पाठपुरावा

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याला ५०३ जणांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट मिळाले होते.

डिसेंबर २०२४ पर्यंत बँकांकडून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता.

मात्र, तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला.

जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही बँकांकडे चकरा मारल्या.

त्यामुळेच जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट पूर्ण झाले असून तब्बल ५२० लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध झाले आहे.

### मराठवाड्यात दुसरा क्रमांक

जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट जिल्हा उद्योग केंद्राने पूर्ण केले. त्यामुळेच जिल्ह्याने विभागात दुसरा क्रमांक पटकावला, तर राज्यात आठव्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

---

# उद्योग क्षेत्रातही 'ती'ची मुशाफिरी; जिल्ह्यातून घडणार महिला उद्योजक

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत ६५ टक्के सहभाग, जिल्ह्यात उद्दिष्ट पहिल्यांदाच पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**अलिबाग :** तरुणांनी उद्योजक क्षेत्रात प्रगती करावी, यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना शासनातर्फे राबवली जात आहे. रायगड जिल्ह्यातही जिल्हा उद्योग विभागातर्फे ही योजना राबविण्यात आली असून यंदा पहिल्यांदाच उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश आले आहे. जिल्हा उद्योग विभागाने वर्षाचे ७४४ अर्जांचे उद्दिष्ट पूर्ण करून ७५५ जणांना बँकांच्या मदतीने उद्योग उभारणीसाठी हातभार लावत उद्दिष्ट १०२ टक्के पूर्ण केले आहे. जिल्ह्यात ३६ कोटी ६६ लाखांचे प्रकल्प किमतीची कर्ज प्रकरणे मंजूर झाली आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत महिलांचा सहभाग ६५ टक्के आहे. भविष्यात जिल्ह्यात महिला उद्योजक मोठी भरारी घेतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

युवक, युवतींना स्वयंरोजगारातून स्वतःची आणि दुसऱ्याची उन्नती व्हावी, या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबवली जात आहे. याअंतर्गत उत्पादन उद्योग, सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीतर आधारित उद्योग, ई वाहतूक व्यवसाय, फिरते विक्री केंद्र व्यवसाय करण्यासाठी कर्ज दिले जाते. प्रक्रिया व निर्मिती व्यवसायासाठी कमाल ५० लाख, व सेवा उद्योग प्रवर्गातील प्रकल्पासाठी कमाल २० लाख रुपये कर्जरूपात दिले जातात.




### कोरोनानंतर अनेक जण वळले उद्योगाकडे

रायगड जिल्ह्यात कोरोनानंतर अनेकजण उद्योगाकडे वळले आहेत. जास्त करून महिलांचा सहभाग अधिक आहे. यंदाच्या उद्दिष्टात ६७ टक्के महिला उद्योजकांनी मुख्यमंत्री रोजगार निर्माण योजनेचा लाभ घेतला आहे. उत्तर रायगड पेक्षा दक्षिण रायगडातून अधिक उद्योजक तरुण, तरुणांनी उद्योगासाठी कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केले होते. महाड ११०, माणगाव ७३, मुरुड ३०, श्रीवर्धन ७५, अलिबाग १७५ इतक्या प्रकरणे मंजूर करण्यात आले.

**१,९२५**

अर्ज जिल्हा उद्योग विभागाने बँकांकडे मंजुरीसाठी पाठविले होते. जास्तीत जास्त अर्ज मंजूर व्हावेत, यासाठी जिल्हा उद्योग विभागाचे गु. श. हरळय्या, महाव्यवस्थापक हे जातीने लक्ष देत होते. २१६ जणांना कर्जाचे वाटप झाले असून उर्वरित अर्जदारांच्या कर्जाचे वाटप सुरू आहे.




### जिल्हाधिकारी यांनी फोडला नारळ

❶ मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजने अंतर्गत व्यवसायासाठी मंजूर झालेल्या कर्जातून काहींनी रिक्षा, सोडा वॉटर व्यवसाय सुरू केला आहे. या व्यावसायिकांच्या व्यवसायाचा नारळ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात फोडण्यात आला.

❷ या वेळी महाव्यवस्थापक गु. श. हरळय्या, उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, लीड बँकेचे अधिकारी विजय कुलकर्णी, उप प्रादेशिक अधिकारी महेश देवकाते उपस्थित होते.

### कर्जासाठी बँकांचेही सहकार्य

बँकांकडून शासकीय योजनेतून कर्ज देताना काहीशी नकारघंटा असते. मात्र यंदा हे चित्र बदलले होते. जिल्हाधिकारी, जिल्हा उद्योग विभाग यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने बँकेनेही योग्य सहकार्य केले आहे.

---

महासागर

# नवउद्योगांना मंजुरी देण्यात जिल्हा राज्यात चौथा तर अमरावती विभागात पहिला!

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ; ३३० नवउद्योजकांनी उभारले उद्योग

**बुलढाणा (जिमाका):** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात चौथं स्थान पटकावलं आहे. मागच्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार, बुलढाणा जिल्ह्याने १२१.९८ टक्के नवउद्योजकांच्या प्रस्तावांना मंजुरी देत उद्दिष्टपूर्ती साधली आहे. यासोबतच अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ या पाचही जिल्ह्यांनी उद्दिष्टापेक्षा अर्थात १०० टक्क्यांहून अधिक प्रस्तावांना मंजुरी देणारा अमरावती विभाग बनला आहे. प्राप्त आकडेवारीनुसार अमरावती विभागांतर्गत बुलढाणा जिल्ह्यासाठी ६७८, अमरावती ८४५, अकोला ८४८, वाशिम ५१८ आणि यवतमाळ जिल्ह्यासाठी ६०२ उद्योग प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते.

सन २०२४-२५ या एका वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात ३,७८६ नवउद्योजकांच्या प्रस्तानवांना मंजुरी देण्यात आली आहे. यात बुलढाणा जिल्हा ८२७ उद्योगांना मंजुरी देण्यात पहिल्या क्रमांकावर आहे.मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील उद्योजकाला ५० लाख रुपये, तर सेवा क्षेत्रातील उद्योजकाला २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातील उद्योजकाला कर्ज रकमेच्या १५ ते २५ टक्के, तर विशेष प्रवर्ग, एससी, एसटी, अपंग, माजी सैनिक, ओबीसी व अल्पसंख्यांकांना २५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता दिल्यानंतर संबंधित प्रकरण बँकेकडे जाते. बँकेने कर्ज प्रकरणाला मंजुरी दिल्यानंतर लाभार्थींच्या खात्यात अनुदान जमा होते.

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात जिल्हा उद्योग केंद्राला मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत ८०० लाभार्थी करण्याचे उद्दिष्ट दिले होते. जिल्हा उद्योग केंद्राने ८३० जणांना लाभ देत १०४ टक्के इतके उद्दिष्ट गाठले आहे. यात गारमेंटमध्ये सर्वाधिक १३६, अन्न प्रक्रिया १४८, ब्युटीमध्ये ७०, फॅशन डिझायनिंगमध्ये १६, ट्रान्सपोर्टमध्ये ३० इलेक्ट्रॉनिक्स आणि इंजिनीअरींग १०० व इतर ३३० असे उद्योग उभारले आहेत.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८३० लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव बँकांनी मंजूर केले असून यातील ३३० उद्योजकांनी ७४२ लाख रुपये शासनाकडील अनुदान घेवून उद्योग उभारले आहेत.

**जिल्ह्यातील तालुकानिहाय लाभार्थींच्या आकडेवारीनुसार सर्वाधिक लाभार्थी बुलढाणा तालुक्यातील आहेत.**

बुलढाणा २४१, चिखली ८५, खामगाव ८९, शेगाव ६४, मेहकर ६५, जळगाव जामोद ३७, संग्रामपुर ३३, नांदुरा ३७, मोताळा ५०, देऊळगाव राजा २०, सिंदखेड राजा ४०, मलकापुर ३९, लोणार २९

जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांनी जिल्ह्यात उद्योग व्यवसाय करु इच्छिणाऱ्या नवउद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत अनुदान दिले जाते. मागच्या आर्थिक वर्षात बुलढाणा जिल्ह्यात उद्दिष्टापेक्षा अधिक ८२७ प्रस्तावांना मान्यता देत जिल्ह्याने राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. ही जिल्ह्यासाठी गौरवाचा बाब आहे. या कार्यक्रमांतर्गत उद्योग सुरु करण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या जिल्ह्यातील इच्छुक तरुणांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

लोकमत

# ुख्यमंत्री रोजगारमध्ये ९७५ तरुण झाले उद्योजक

## गर आघाडीवर : १०० ोटींची गुंतवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिल्यानगर :** युवक-युवतींना स्वयंपूर्ण, ात्मनिर्भर बनविण्यासाठी, तसेच योजकतेला चालना देण्यासाठी ुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम बविण्यात येतो. गत वर्षभरात हिल्यानगर जिल्ह्यातील ९७२ कल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या कल्पातील १०० कोटी रुपयांच्या ंतवणुकीतून ४ हजार ८३३ जणांना ोजगार उपलब्ध होणार आहे. नाशिक ्भागात अहिल्यानगरच्या सर्वाधिक कल्पांना मंजुरी मिळाली आहे.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती ार्यक्रमात नवउद्योजकांना उत्पादन व वा क्षेत्रातील उद्योग उभारणीसाठी नुदान दिले जाते. यासाठी ऑनलाइन र्ज करता येतो. त्याची छाननी जिल्हा द्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांमार्फत ते. त्यानंतर हे प्रकल्प ल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील मितीकडे मान्यतेसाठी पाठवले जातात. ा समितीच्या मान्यतेनंतर ही प्रकरणे कांकडे कर्ज मंजुरीसाठी पाठवली ातात. पालकमंत्री राधाकृष्ण खे पाटील, तत्कालीन ल्हाधिकारी सिद्धाराम ालीमठ, जिल्हा हाव्यवस्थापक अतुल ंगे, उद्योग अधिकारी ालाजी बिराजदार यांच्या ाठपुराव्यामुळे या ार्यक्रमात यश आले.

**४** हजार ८३३ जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

### कोणत्या बँकांनी किती प्रस्ताव मंजूर केले?

| | |
|---|---|
| सेंट्रल बँक | ३१६ |
| महाराष्ट्र बँक | १६० |
| बडोदा बँक | १५४ |
| युनियन बँक | ११५ |
| स्टेट बँक | ७६ |
| इंडियन ओव्हरसीज | ३८ |
| बँक ऑफ इंडिया | २५ |
| कॅनरा बँक | २५ |
| आयडीबीआय | २४ |
| पंजाब नॅशनल बँक | १२ |
| युको बँक | ८ |
| इंडियन बँक | ७ |
| महाराष्ट्र ग्रामीण बँक | ७ |
| आयसीआयसीआय | ३ |
| एचडीएफसी | १ |
| पंजाब सिंध बँक | १ |
| एकूण | ९७२ |

### कोणाला किती अनुदान?

उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाखांपर्यंत, तर सेवा क्षेत्रासाठी २० लाखांपर्यंत कर्ज मिळते. सर्वसाधारण वर्गातील उद्योजकाला १५ ते २५ टक्के, तर राखीव प्रवर्गातील उद्योजकाला २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत अनुदान मिळते. अनुदान थेट बँक खात्यात जमा होते.

### असे मंजूर झाले प्रस्ताव

| | |
|---|---|
| प्राप्त अर्ज : | ४ हजार ७५८ |
| बँकांकडे पाठवले : | २ हजार ९१९ |
| कर्ज मंजूर : | ९७२ प्रस्ताव |
| कर्जमंजुरीची रक्कम : | ९५ कोटी ८१ लाख |
| अनुदानाची रक्कम : | ३० कोटी ३१ लाख |

### निकष काय?

वय १८ किंवा ४५ पेक्षा जास्त नसावे. एसी, एसटी व महिला, तसेच विशेष प्रवर्गासाठी पाच वर्षे सूट देण्यात आली. कुठलेही स्थायी उत्पन्न नसावे.



तरुणांनी उद्योग, व्यवसाय उभारणी करून रोजगारनिर्मिती करावी. भविष्यात छोट्या व्यवसायाचे, उद्योगाचे मोठ्या व्यवसायात रूपांतर करण्यासाठी वाटचाल करावी. बँकांकडून मिळालेल्या कर्जाची नियमित परतफेड करून इतरांनाही उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शन करावे. परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत.

**अतुल दवंगे,** महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र

Hello Ahmednagar
Page No. 4 Apr 16, 2025

लोकमत

# ुख्यमंत्री रोजगार निर्मितीत जेल्ह्यात महिलांचा वाटा मोठा!

ोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगारासाठी केली जाते मदत : आत्मनिर्भर होण्यास आधार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मगाव :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती ्क्रमांतर्गत बेरोजगार युवक-युवतींना ्रोजगारासाठी मदत केली जाते. या ्क्रमाचा उद्देश सूक्ष्म व लघु उद्योग ात रोजगार निर्माण करणे आहे. ्ह्यात विशेषतः महिला या योजनेमुळे मनिर्भर बनल्या असून, स्थानिक ्गार निर्मितीत त्यांचा महत्त्वाचा ा आहे.



### ्० महिलांची ्योगात भरारी!

योजनेंतर्गत १५० महिलांना सूक्ष्म व ् उद्योगांसाठी कर्ज व मार्जिन मनी ्ाला आहे. या उद्योगांमध्ये महिलांनी ी घेतली. महिला आत्मनिर्भर झाल्या ्न, इतरांनाही त्यांनी रोजगार ा आहे.

### निकष काय ?

लाभार्थ्यांची पात्रता १८ वर्षे पूर्ण, तर अधिकतम मर्यादा ४५ वर्षे आहे. १० लाखांवरील प्रकल्पासाठी सातवी पास, तर २५ लाखांवरील प्रकल्पासाठी दहावी पास असणे आवश्यक आहे. कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येतो. हे सर्व निकष लाभासाठी पूर्ण करणे गरजेचे आहे.

**८२७** जणांचे अर्ज मंजूर

या कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ मध्ये ६७८ लाभार्थ्यांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. शंभर टक्क्यांवर उद्दिष्टपूर्ती झाली असून, ८२७ जणांचे अर्ज मंजूर केले आहेत.

### कोणत्या बँकेकडून महिलांची किती प्रकरणे मंजूर?

| बँक | मंजूर प्रकरणे |
|---|---|
| बँक ऑफ बडोदा | ६ |
| विदर्भ कोकण ग्रामीण बँक | ३८ |
| बँक ऑफ इंडिया | ७ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | १३ |
| कॅनरा बँक | ४ |
| सेंट्रल बँक | २२ |
| आयडीबीआय | १ |
| इंडियन बँक | १ |
| इंडियन ओव्हरसीस बँक | २ |
| पंजाब नॅशनल बँक | ५ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १७ |
| युनियन बँक ऑफ इंडिया | २ |
| युको बँक | १ |

### काय आहे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना?

1. योजनाअंतर्गत १८ ते ४५ वयोगटातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती, जमाती, माजी सैनिक दिव्यांग लाभार्थ्यांना कर्ज दिले जाते. शहरी भागासाठी ७५ टक्के आणि ग्रामीण भागासाठी ६० टक्के कर्ज दिले जाते.
2. मार्जिन मनी २५ टक्के आहे. उत्पादन उद्योगासाठी ५० लाख आणि सेवा उद्योगासाठी १० लाख रुपयांपर्यंत प्रकल्प मर्यादा आहे. ५० ते ७५ टक्के कर्ज दिले जाते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याने चांगली कामगिरी केली आहे. या योजनेंतर्गत उद्दिष्ट निर्मिती जिल्हा राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे. महिलांचा उद्योगांमध्ये सहभाग वाढवण्यात योजना मदतगार ठरत आहे.

**-प्रमोद लांडे,** महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र.

Hello Khamgaon
Page No. 3 Apr 11, 2025

लोकमत

# बुलढाणा जिल्हा नवउद्योग मंजुरीत राज्यात चौथा

## ८३० प्रस्तावांना मान्यता; ३३० उद्योग उभारले



लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करीत राज्यात चौथे आणि अमरावती विभागात पहिले स्थान मिळवले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यासाठी ६७८ प्रस्तावांचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात ८२७ प्रस्ताव मंजूर होऊन १२१.९८ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे.


अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांनी उद्दिष्टापेक्षा अधिक कामगिरी केली असून, विभागात एकूण ३७८६ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

या योजनेअंतर्गत उत्पादन क्षेत्रात ५० लाख, तर सेवा क्षेत्रात २० लाखांपर्यंत कर्ज मिळते. विशेष प्रवर्गातील लाभार्थ्यांना २५-३५ टक्के आणि इतरांना १५-२५ टक्के अनुदान दिले जाते. बँकांनी मंजूर केलेल्या ८३० प्रकरणांपैकी ३३० नवउद्योजकांनी ७४२ लाखांचे अनुदान घेऊन उद्योग सुरू केले. "तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा," असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

**३७८६** प्रस्तावांना विभागात मंजुरी देण्यात आली.

| जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| बुलढाणा | ६७८ | ८२७ | १२१.९८ |
| अमरावती | ८४५ | ९१० | १०७.६९ |
| अकोला | ८४८ | ८९९ | १०६.०१ |
| वाशिम | ५१८ | ५३९ | १०४.०५ |
| यवतमाळ | ६०२ | ६११ | १०१.५० |

### उद्योगांचे क्षेत्रवार वर्गीकरण




Akola Main
Page No. 5 Apr 04, 2025

लोकमत

# जिल्ह्यातील ८१७ नवउद्योजकांचे कर्जप्रकरण मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांचे निर्देशन व मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले. जिल्ह्यात एकूण २४४२ प्राप्त अर्जांपैकी २२१० नवउद्योजकांचे अर्ज पात्र ठरले. त्यापैकी ८१७ नवउद्योजकांचे कर्जप्रकरण मंजूर करून त्यांना वित्त पुरवठा करण्यात आला. लाभार्थ्यांना अनुदान (सबसिडी) मिळवून देण्यातही जिल्हा राज्यात अग्रेसर असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अर्जिक्य आजगेकर यांनी दिली.

बँक ऑफ इंडियाने २२७, बँक ऑफ महाराष्ट्र १३३, विदर्भ कोकण ग्रामीण बँक १३३, कोटक महिंद्रा बँक ८०, स्टेट बँक ऑफ इंडिया ६०, युनियन बँक ४७ अशी मंजुरी नोंदविली आहे. तसेच जिल्ह्यातील इतर सर्व बँकांनी उद्दिष्टपूर्तीसाठी सहकार्य केले आहे. सार्वजनिक व खासगी बँकांनी त्यांना दिलेले उद्दिष्ट विहित वेळेत पूर्ण केल्याने चालू आर्थिक वर्षात योजनेंतर्गत जिल्ह्याची उद्दिष्टपूर्ती झालेली आहे. जिल्हाधिकारी यांनी सातत्यपूर्ण बैठका घेऊन हे लक्ष साध्य केले आहे.

**२४४२** प्राप्त अर्जांपैकी २२१० नवउद्योजकांचे अर्ज पात्र ठरले.

या उद्दिष्टपूर्तीसाठी पालकमंत्री उदय सामंत आणि जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अग्रणी बँक व्यवस्थापक मुकुंद खांडेकर, सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, शाखा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्राचे सर्व अधिकारी, कर्मचारी व खादी ग्रामोद्योग मंडळाचे कोलथरकर, सर्व कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेच्या उमेद (एमएसआरएलएम) व माविम यांनी जिल्ह्यात रोजगार मेळावे आयोजित करून बचतगटांना या योजनेचा लाभ देण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

Hello Ratnagiri
Page No. 4 Apr 03, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# मुख्यमंत्री रोजगारनिर्मितीत जिल्ह्यातील महिलांचा वाटा मोठा

## ३५५ जणांची उद्योगक्षेत्रात भरारी : जिल्हा उद्योग केंद्रामार्फत शासन योजनांचा मिळाला लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्ह्यात हजारो तरुण-तरुणींनी उद्योग सुरू करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज दाखल केले आहेत. यापैकी ३५५ अर्ज जिल्हा उद्योग केंद्राकडून विविध बँकांकडे पाठविण्यात आले असून, हे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. यामध्ये बहुतांश महिलांचा समावेश आहेत. विशेष म्हणजे, प्रस्ताव मंजूर झालेल्या महिलांमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग, ओबीसी, एससी, एसटी आणि अल्पसंख्यकमधून एक याप्रमाणे महिला तसेच युवक आहेत. यापैकी बहुतांश लाभार्थींना शासनाकडून अनुदान देण्यात आले आहे. या माध्यमातून महिलांनी विविध क्षेत्रांत उद्योग स्थापन करीत स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

महिलांनी विविध क्षेत्रांत उद्योग स्थापन करीत स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

स्थानिक बँकांमार्फत कर्ज मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, जिल्हा उद्योग केंद्रांकडून त्यासाठी सहकार्य केले जात आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारच्या उद्योग-व्यवसायाकरिता युवक-



युवतींचे प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडे प्राप्त झाले होते. त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले प्रस्ताव विविध बँकांकडे पाठविले जातात. संबंधित बँकेकडून उद्योग-व्यवसायाकरिता कर्जपुरवठा केला जातो. ३५५ प्रस्तावांना मंजुरी मिळाली. यात महिलांची संख्या अधिक आहे.

### शेकडो महिला उद्योगात

जिल्हा उद्योग केंद्राकडे प्राप्त झालेल्या हजारो अर्जांपैकी ३५५ प्रस्ताव बँकेकडे पाठवले होते. ते संपूर्ण प्रस्ताव बँकांनी स्वीकारले असून, मंजूर केले आहेत. यात शेकडो महिलांनी उद्योग सुरू केले आहेत.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमामुळे जिल्ह्यातील अनेक युवक-युवती उद्योजक बनल्या आहेत. यात महिलांचा सहभाग उत्साहवर्धक आहे. जिल्ह्यात ३५५ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. यामध्ये महिलांना उद्योगासाठी अर्थसाहाय्य दिले आहे.

**- ए.बी.खराले,** व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया

### हजारो अर्ज

जिल्हा उद्योग केंद्राकडे सुमारे हजारो युवक-युवतींचे विविध उद्योग-व्यवसायाकरिता अर्ज प्राप्त झाले आहेत.

### काय आहे योजना?

या योजनेसाठी बेरोजगार तरुणांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. यात अनुदानासह बँकांकडून कर्ज मिळते.

### निकष काय?

उमेदवाराचे वय १८ वर्षांवर असावे. उत्पन्नाची मर्यादा नाही. उमेदवार कमीत कमी आठवी पास असावा. महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्याने कोणताही उद्योग सुरू केलेला नसावा.

# Awareness Camps Conducted under CMEGP

| Awarness Camps Report FY-2024-25 | |
|---|---|
| No. of camps in Polytechnic and Engg. Colleges | 112 |
| No. of camps in I.T.I. or its equivalent other Technical Institute | 223 |
| No. of camps in Other Colleges | 286 |
| Camps in coordination with other agencies (for eg. MAVIM/UMED/NGOs) | 953 |
| **Total No. of Camps Conducted** | **1574** |
| **Total No. of attendees for camps** | **72600** |
| **Total Applications Received during camp** | **26784** |








गावचा इतिहास








MAHARASHTRA CENTRE FOR


SAFETY PARK
PERSONAL PROTECTIVE EQUIPMENTS










शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
विक्रमगड, जि. पालघर
1) FITTER - FABRICATION
2) ELECTRICAL TECHNICIAN
3) DOMESTIC IT HELPDESK ATTENDANT








जिल्हा उद्योग केंद्र गोंदिया
Human Heart






PETROL

